# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-05.04.2026** **वार- रविवार**

---

**नाशिक**

राज्यात गेल्या आठवड्यात अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे पीकांचे नुकसान झालं आहे. नियमानुसार या शेतकऱ्यांना शासनाकडून आवश्यक ती भरपाई देण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. ते आज नाशिकमध्ये अखिल भारतीय संत संमेलनाच्या कार्य समितीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं नुकसान झाल्यानंतर पंचनामा केला जातो आणि त्यानंतर भरपाई दिली जाते ही पारंपारीक पध्दतच सुरू असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**उपमुख्यमंत्री**

दरम्यान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज बारामती तालुक्यातल्या विविध गावांत जाऊन अवकाळी पावसानं झालेल्या पीक नुकसानीची पाहणी केली. तसंच शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असं सांगत सरकार बळीराजाच्या दुःखात सहभागी असून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे असंही उपमुख्यमंत्री पवार यावेळी म्हणाल्या

**पोटनिवडणूक**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उद्या म्हणजेच सोमवारी उमेदवारी अर्ज भरणार आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली म्हणून ही निवडणूक बिनविरोध करावी असं आवाहन महायुतीकडून करण्यात आलं आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं या निवडणुकीत उमेदवार उभा न करण्याचा निर्णय घेतला आहे. पण काँग्रेसनं मात्र आपला उमेदवार रिंगणात उतरवण्याची भूमिका घेतली असल्याचं वृत्त आहे.

**ईस्टर**

ईस्टरचा सण आज सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर त्यांचं याच दिवशी पुनरुथ्थान झाल्याच्या आनंदाप्रित्यर्थ हा सण साजरा केला जातो. राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ईस्टरनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यासह पुणे परिसरातील विविध चर्चमध्येही आज ईस्टरनिमित्त विशेष प्रार्थना सभाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**गर्भाशय शस्त्रक्रिया समिती**

ऊसतोड महिलांच्या अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रिया रोखण्यासाठी राज्य विधान परिषदेच्या उपसभापती डॉकटर नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीची पहिली महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पुण्यात पार पडली. या बैठकीत केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी उपस्थित राहून ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्याशी संबंधित संवेदनशील प्रश्नांकडं प्रशासनाचं लक्ष वेधलं. महिलांच्या आरोग्याबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाऊ नये आणि त्यांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी या बैठकीत ठोस आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला.

**प्रकाशन**

काव्य म्हणजे संक्षिप्त शब्दसंचयातून संपूर्ण भावनेला उद्‌गारीत करणारं, वैश्विक आशय सांगणारं साहित्य होय,असं मत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी व्यक्त केलं. प्राध्यापक डॉक्टर नितीन करडेकर लिखित 'कनिक' काव्यसंग्रहाचं प्रकाशन आज त्यांच्या हस्ते पुण्यात झालं. त्यावेळी ते बोलत होते. वेदांतश्री: प्रकाशनतर्फे या काव्यसंग्रहाचं प्रकाशन करण्यात आलं आहे. तंत्रक्षेत्रात कार्यरत असूनही माझ्यातील अस्वस्थता, सर्जनशीलता, प्रत्येक विचारात दडलेला गभितार्थ हा काव्यनिर्मितीसाठी उपयुक्त ठरला,असं नितीन करडेकर यांनी त्यांच्या मनोगतात सांगितलं.

**कलाश्री संगीत महोत्सव**

गुरुकुल कलाश्री संगीत मंडळाच्यावतीनं दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या पिंपरी चिंचवड परिसरातील कलाश्री संगीत महोत्सवाचा समारोप आज होत आहे. या महोत्सवाचं हे २८वं वर्ष असून सांगवी-पिंपळे गुरव इथल्या नटसम्राट निळू फुले रंगमंदिरात आयोजित या महोत्सवात आज कलाश्री पुरस्कार ख्यातनाम गायिका आरती अंकलीकर- टिकेकर यांना तर कलाश्री युवा पुरस्कार युवा तबला वादक सोहम गोराणे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसंच आजच्या समारोपाच्या दिवशी प्रसिद्ध सतारवादक उस्ताद रईस बाले खान यांचं सतारवादन, पंडिता डॉक्टर रोहिणी भाटे यांच्या शिष्या नृत्यांगना ऋजुता सोमण यांची कथक नृत्य प्रस्तुती तसंच किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक आणि गुरुकुल कलाश्री संगीत मंडळाचे संस्थापक पंडित सुधाकर चव्हाण यांचं गायन होणार आहे.

**खो-खो**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज बिनविरोध निवड झाली. बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्यानं ही निवडणूक बिनविरोध झाली.खो-खो संघटनेत अनेक वर्षांनी हा सन्मान एका महिलेला मिळाला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात कालपासून पावसानं काहीशी विश्रांती घेतली आहे. आज दिवसभरात कमाल 35 तर किमान 20 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**